# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी - २२६१७९६९ फॅक्स-२६९०००७
E-mail: desk18@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


**रजिस्टर एडी / ईमेल**

क्र.१८/तंशिसं/वि.का.पत्र/२०१८/१८८
दि. १६/०५/२०१८

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई /पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

विषय - राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या योजनांच्या सन २०१७-१८ करिता तपासणीसाठी प्रलंबित अर्जासाठी उपाय योजना...

संदर्भ - या कार्यालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/वि.का.पत्र/२०१८/१८१ दि. १०/०५/२०१८

उपरोक्त विषयांस अनुसरुन संदर्भीय पत्राद्वारे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता, संस्था व विभागीय स्तरांवर तपासणीसाठी प्रलंबित राहिलेल्या अर्जांबाबत खुलासा मागविण्यात आला आहे तो संचालनालयास अद्याप अप्राप्त आहे.

विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी, उपरोक्त विषयांकीत योजनांसाठी पुन्हा अर्जांच्या तपासणीची मुदत वाढवून देण्यात येत असून दि. २५/०५/२०१८ पर्यंत आपल्या अखत्यारित येणाऱ्या संस्थांना कळवून, संस्था स्तरावर तपासणीसाठी प्रलंबित राहिलेल्या अर्जांची तपासणी करुन अर्ज मंजुर / नामंजुर करुन घ्यावे. तसेच विभागीय स्तरांवर प्रलंबित राहीलेले अर्ज दि. २५/०५/२०१८ पर्यंत तपासणी करुन अर्ज मंजुर / नामंजुर करावे. तसेच संकेतस्थळावर नवीन अर्ज भरण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि. २५/०५/२०१८ नंतर जर कोणतेही अर्ज प्रलंबित राहिले तर ते रदद करण्यात येतील व रदद केलेल्या अर्जांची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागीय कार्यालयाची राहील हे आपल्या माहितीसाठी.

आपला,

(डॉ. अभय वाघ.)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा. मुंबई.

प्रत कार्यासन क्र. ३ , आय.टी. सेल, मुख्य कार्यालय यांना माहितीसाठी व फक्त भरलेले अर्जाची तपासणी करण्याची लिंक उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच संस्थांना एसएमएस करुन अर्जांच्या तपासणीबाबत कळविण्यासाठी.

पृष्ठ क्र. तंशिसं/विकाना/शैवि/ईबीसी/2018/ 1864
दिनांक :- 18 MAY 2018

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय तंत्रनिकेतन, अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था , नागपूर विभाग,
नागपूर .

सदर पत्रात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करुन प्रलंबित असलेले अर्ज **विहीत मुदतीत** या कार्यालयास सादर करण्यांत यावे.

(गुलाबराव ठाकरे)
**सहसंचालक,**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर.